**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **agpureduboard.i**

पत्र क.नाविमं/प.उ.मा./637
नागपूर,दि. 20/02/2024
21

प्रति,

मा. संचालक
माहिती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय
नागपूर विभाग नागपूर

विषय :– फेब्रु –मार्च 2024 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी.) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी.) परीक्षेसंदर्भात चुकीच्या बातम्याबाबत.
संदर्भ :–राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क /परीक्षा– 02/759. दिनांक – 20/02/2024

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च 2024 मध्ये घेण्यात येणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी.) परीक्षेसंदर्भात चुकीच्या बातम्याबाबत प्रकटन सोबत जोडले आहे. तरी सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केद्रांनी बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी. ही विनंती.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपीः–
1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3)शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.
4) मुख्याध्यापक / प्राचार्य ( सर्व जिल्हे) सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये, प्रकटनातील निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करावी.
5) मा. संपादक, दैनिकभास्कर, सकाळ, महाराष्ट्रटाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, लोकमतसमाचार, तरूण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ०४

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२४

### ।। प्रकटन ।।

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणारी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची लेखी परीक्षा दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ ते दिनांक १९ मार्च २०२४ व माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान या विषयांची ऑनलाईन परीक्षा दिनांक २० ते २३ मार्च २०२४ या कालावधीत तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) ची लेखी परीक्षा दिनांक १ मार्च २०२४ ते २६ मार्च २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी परीक्षा कालावधीत विविध माध्यमांद्वारे तसेच सोशल मिडीयावर परीक्षेच्या अनुषंगाने अफवा प्रसारित केल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची संभ्रमावस्था वाढते. म्हणून अशा अफवा तसेच विद्यार्थी व पालकांची दिशाभूल केल्या जाणाऱ्या बातम्या पसरविणाऱ्याच्या विरोधात मंडळामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक - २०/२/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४.